# लावण्यखणी

(फक्कड लावणीसंग्रह)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)

मंजुभारती प्रकाशन

**लावण्यखणी** (फक्कड लावणीसंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
E-mail : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : पौष कृ. १०, शके १९४४,
मंगळवार, दि. १७ जानेवारी, २०२३

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
मो. ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : **978-81-953257-6-4**

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ १२०/-

# अर्पणपत्रिका



''सुंदरा मनामध्ये भरली'' असं म्हणत ज्या शाहिराने लावणीत आपले प्राण ओतले त्या राम जोशींना हा माझा लावणी रचनासंग्रह अतीव आदराने समर्पित !

# पूर्वपीठिका

महाराष्ट्राच्या लोकसाहित्याचे लावण्य म्हणजेच 'लावणी'. लावणीशिवाय महाराष्ट्राची लोकसंस्कृती पूर्ण होऊ शकत नाही. सौंदर्याने ओतप्रोत असते ती लावणी. हे सौंदर्य शब्दरचनेचं, गायकीचं, सादरीकरणातील नृत्य व सादरकर्त्या लावण्यवतीच्या इंगिताचं असतं. भक्तीची लावणी करत पुढे शृंगाराच्या लावण्यात रमलेली लावणी म्हणजे महाराष्ट्राचे साहित्यिक अहोभाग्यच ! लावणी ही शृंगार व भक्ती या दोन्ही रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक असे माध्यम समजले जाते. भक्तिरसयुक्त लावणी मागे पडत जाऊन आता लास्यरसयुक्त लावणी ही लोकप्रसिद्धीस गेली आहे. लास्यरस म्हणजे शृंगाराचा परिपोषक रस. गीत, नृत्य आणि प्रभावी अदाकारी यांचा सुरम्य संगम लावणीत झालेला दिसतो. मराठी लोकनाट्याच्या विकासातही लावणीचे खूप मोठे योगदान आहे. तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या लावणीला पेशवाईत वैभव मिळाले आणि आजही तिची प्रतिष्ठा कायम आहे.

राम जोशी, अनंत फंदी, पठ्ठे बापूराव, प्रभाकरादि शाहिरांनी लावण्यांच्या रचना करीत भक्ती, वीर व वात्सल्य हे रसही शृंगारासोबतच लावणीत पेरले.

अभिजात संस्कृत साहित्याची अभ्यासक असल्याने शिवाय मराठीत नानाविध काव्यरचना हातून घडत असताना आपल्या हातून कधी लावण्या लिहिल्या जातील असा विचारही माझ्या मनाला शिवला नव्हता. परंतु शारदेच्या आशीर्वादाने जे संकेत मिळाले त्यानुसार अवघ्या ३ दिवसात ६० हून अधिक लावण्या लेखणीतून उतरत गेल्या आणि मलाच आश्चर्याचा धक्का वाटू लागला. जून २०20 च्या कोरोना काळातील ते तीन दिवस माझ्यासाठी जणू लावण्यमय देवाशीष घेऊन शब्दात उतरले असेच मला वाटते.

शांताबाई शेळके यांनीदेखील अनेक सुंदर लावण्यांच्या रचना केलेल्या आहेत. स्त्रीकडून लावणी रचनेची त्यांचीच ही परंपरा पुढे नेऊ शकत असल्याने कृतार्थ वाटते आहे.

या लावण्यांना सादरीकरणाचे भाग्य लाभावे आणि रसिकांच्या हृदय सिंहासनावर आरूढ होता यावे, हीच कामना !

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

## १

(देवाचं काम हाय इसरू नका, टाळाटाळ ती कशास उगा,
आधी हात जोडा, पाव्हणं हात जोडा
सांजच्याला जाऊन देवळात, हिच्या संगतीनं तुमीबी हात जोडा)

सांजच्याला जाऊ आपण देवळात
जोडीनं माझ्या तुमी पाया पडा
हातात घेऊन पेढ्याचा पुडा अन्
नवस बोललेला सजना फेडा ।।धृ.।।

भेट आपली झाली पहिल्यांदा
थियटरमध्ये दुसऱ्यांदा
जोडीदाराचा सुटला तिडा
अन् नवस बोललेला सजना फेडा ।।१।।

तवाच आलं मनात माझ्या
देवा रं, ह्योच दे दादला मला
जसा खडीसाखरेचा खडा
अन् नवस बोललेला सजना फेडा ।।२।।

तुमी मिळालात, काय नगं मला
तुमचंच सुख मी मागीन देवाला
अंगणात सुखाचा सडा
अन् नवस बोललेला सजना फेडा ।।३।।

## २

(बया बया बया काय बॉडी हाय, पैलवान गडी ह्यो रूबाब काय
तुमी इसरलात समदं इसरलात)

ढेरी बघा तुमची आलीया वर
व्यायाम करा तुम्ही वरचेवर
मला तुम्ही कसे फिट पाहिजेत ना
सिक्स पॅक आणीन म्हणलांत ना ।।धृ.।।

सकाळी सकाळी लवकर उठा
साखर झोपीला सोडून टाका
घाला तुम्ही दंड नि बैठका
मला तुम्ही कसे फिट पाहिजेत ना
सिक्स पॅक आणीन म्हणलांत ना ।।१।।

शहरात म्हणं जिम मधी जात्यात
सायकलवर किमी किमी पळत्यात
तुम्ही रानात डोंगरावर जाना
मला तुम्ही कसे फिट पाहिजेत ना
सिक्स पॅक आणीन म्हणलांत ना ।।२।।

सूर्याला तुम्ही नमस्कार घाला
योगासनं अन प्राणायाम करा
जिभंवर ताबा ठेवायचा हा
मला तुम्ही कसे फिट पाहिजेत ना
सिक्स पॅक आणीन म्हणलांत ना ।।३।।

वशाट खाणं सोडून द्या
वाढतीया चरबी शाकाहारी व्हा
कामानं शरीर दमवा ना
मला तुम्ही कसे फिट पाहिजेत ना
सिक्स पॅक आणीन म्हणलांत ना ।।४।।

## ३

(कशाला झुरताय हितं तिथं फिरताय, एका जाग्यावर गुमानं ऱ्हावं,
हिच्या नजरेनं तुमी की पहावं, दाजी नजरेनं ----- हो पहावं...)

मदमस्त नजर ही माझी
तुमी खुशाल बुडून जावा
आत महाल सजलाय सपनाचा
तुमी राजा बनून ऱ्हावा ।।धृ.।।

नजरेनं माझ्या घायाळ किती
रानातली पाखरं अवतीभवती
अजूनबी बंदी ठेवलंय त्यासनी
तुम्हासनी इसावा द्यावा
तुमी राजा बनून ऱ्हावा ।।१।।

समदी माझ्या मागं, म्या तुमच्या मागं
तुमच्या इचारात माझ्या समदं जीवनाचं धागं
नजरेच्या दारानं सरळ यावा
देखणा देखून घ्याकी देखावा
तुमी राजा बनून ऱ्हावा ।।२।।

या नजरेची जादू कमाल करतीया
गारुड आपलं जमवून ठेवतीया
तुमीबी अनुभव घ्याना
मग कायमचं हितंच रहाना
तुमी राजा बनून ऱ्हावा ।।३।।

## ४

(दाजी तुमी उगाच मरमर करताय, चुकले निशाणे खिशात भरताय,
थांबा... जरा थांबा... हिचं म्हणणं तरी हो ऐका...)

कशाला तुम्ही हो मारताय डोळा
जिवाला करताय गोळा मोळा
मी हाय राजी, तुमी माझं राजा
हळूच उघडा दिल दरवाजा
नगं उगाच कसला घोटाळा
त्याला नाहीच लावलाय म्या टाळा ।।धृ.।।

तुमच्यावानी कुणी डोकवंल मनी
गुज पिरतीचं सांगंल, कानी
म्हणून मनाच्या दाराला
जागा न्हाईच कडी नि कोंड्याला
उगाच तुम्ही मारताय डोळा ।।२।।

आली जवानी आली, नार तरुण झाली
अंगा अंगात रस ह्यो भरलेला
कुणी टाकंल खडा, जरा राहून उभा
म्या दार न्हाय केलंया खिडकीला
उगाच तुम्ही मारताय डोळा ।।३।।

उतावीळ त्यो अन् उतावीळ म्या
येळ कशाला मग वाया घालवा
मेळ दोघांचा झटपट जमवा
न्हाई कुलूप परसदाराला
अन् उगाच तुम्ही मारताय डोळा ।।४।।

## ५

(तुमी लई तालेवार, ऐवज मालदार हिच्या इष्काचं हिरं की जडवा...
तुम्ही एक एक दागिना घडवा... तुम्ही एक एक दागिना घडवा...)

दागिन्यांनी मला मढवीन म्हणलात
काय काय माझ्यासाठी घडवीन म्हणलात
सोनाराला तुम्ही ऑर्डर करा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।धृ.।।

बोटात अंगठी, केसात आकडा
सोन्याचं फुल अन् कानाचे वेल न्
वर बुगडीचा तोरा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।१।।

एकदाणी, बोरमाळ, मोहनमाळ
लखुली, राणी चपलाहार
कंठी चिंचपेटी सरीसरा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।२।।

हातात पाटल्या बांगड्या
चिंचोडी गोठ तोडे कंकण करा
बाजूबंद हात ह्यो भरा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।३।।

नाकात नथणी मोरणी चमकी
कमरला येखांदा छल्ला
बेलपानी ही अन् तन्मनी सुंदरा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।४।।

एक एक दागिना पिरतीचा नमुना
जपून ठेवीन तिजोरीत
माझ्या दिलाच्या चाव्या हातात घ्याव्या
ऐवज सांभाळा सारा
रुपाच्या चांदण्यात सोनेरी रंग
मिसळून जाऊद्या सारा ।।५।।

६

(तुम्हासनी म्हणं लई काय काय आवडतं
जगातलं सारं म्हणं पानात पडतं...
हिच्या हाताची चव तुम्ही चाखलीच न्हाय
मग सांगा की नक्की खाल्लं काय...?)

कशाला खाताय मिळमिळ पिज्झा
बर्गर चाट सारं भरू नगा
प्रेमानं थापतीया, खावा ना
एका भाकरीत तिकडंच जावा ना ।।धृ.।।

रोज रोज तुमचं मैतर येती
भायेर तुमासनी घेऊन जाती
काही बाही खायला घालत्यात
घरीच पोटभर जेवा ना
एका भाकरीत तिकडंच जावा ना ।।१।।

जवा मी थापतीया गोल गोल भाकरी
कालवण खमंग तिच्या सोबती
शेजारी इचारणा करतेत ना
मला सुगरण समदीच म्हणत्यात ना
एका भाकरीत तिकडंच जावा ना ।।२।।

हाताला चव न्यारीच हाय
बाहेरचा नाद काय बरा न्हाय
काय ती भेळ काय पाणीपुरी
भाजी भाकरीची तरतरी बघा ना
एका भाकरीत तिकडंच जावा ना ।।३।।

भारतीय खाणं जगात जाणं
गावाची सर येईल का
शहराला खाणं हे शिकवा ना
गावरान मेवा ह्यो दाखवा ना
एका भाकरीत तिकडंच जावा ना ।।४।।

## ७

(कुणासनीबी हिनं फिरकू न दिलंया, जीवापाड जे राखून ठेवलंया
तुम्हांसनी दिलं दिलं, तुमी घेतलं का, तुमचं बी दिल तुम्ही दिलं का...)

तिजोरीच्या चाव्या कमरेला द्याव्या
अडकवून छल्ल्यात राया
दुकानाचा बिल्ला सांभाळीन मी
रूपाचा ताबा घ्यावा
तुमी माझ्या रूपाचा ताबा घ्यावा ।।धृ.।।

एक एक ऐवज फार मोलाचा
नजर बारीक ठेवा
सणावाराला उजळून त्याला
जरा मोकळी हवा द्यावा
खिशाला माझ्या हवाली करा
रूपाचा ताबा घ्यावा ।।२।।

कमावलेलं जपावं लागतं
जिवापाड ते लपवावं लागतं
जगभर बोभाटा झाला, तर
चर्चेला सुगावा द्यावा
मला तुमी दडवून ठेवा
रूपाचा ताबा घ्यावा ।।३।।

दावू नका तुम्ही, कुणाला हे धन
लोकं वाकडा डोळा ठेवत्यात
चोर डाकू नि दरोडेखोरांपासून
गबूळं जपून ठेवा
अन् रूपाचा ताबा घ्यावा ।।४।।

## ८

(वरवर फिरणं लई लई झालं, थाटा की घरकुल, हिला सपान आलं...
घ्यावा द्यावा की जरासा सल्ला)

छम छम छल्ला, प्रेमाचा बिल्ला
कमरेला लावून मिरवीन
कर्तबगारी धन्याची भावकीत
चाव्यांच्या रूपानं फिरवीन ।।धृ.।।

राब राब राबतोय मालक माझा
काटकसरीनं सारं पुरवीन
सांजच्याला दमून भागून आला की
माझ्या हातानं घास त्याला भरवीन
कर्तबगारी धन्याची भावकीत
चाव्यांच्या रूपानं फिरवीन ।।१।।

रोज पूजा करताना धन्याला यश
औक्ष बी त्याला मागीन
माझं सारं जे जे काही हाय ना
समदंच त्याला मी अर्पीन
अन् कर्तबगारी धन्याची भावकीत
चाव्यांच्या रूपानं फिरवीन ।।२।।

वाढू दे त्याची श्रीमंती सारी
म्या जतन करून ठेवीन
पुढच्या पिढीला देऊया वारसा
मी छल्ला जाडसर करवीन
अन् कर्तबगारी धन्याची भावकीत
चाव्यांच्या रूपानं फिरवीन ।।३।।

## ९

(लांब ऱ्हावा पाव्हणं, हे नाजूक गाणं, हळूच तारा छेडी,
हळूहळूच वाढतीया गोडी, हळूहळूच वाढतीया गोडी...)

मी ताजी ताजी रसरसाळी
जिवाला थंडावा देणारी
दिलानं मारावी लगेच उडी
मी अशी कलंगडी काकडी ।।धृ।।

मी येलीवर राहते, वयात येते
तुमची आधीच खाण्याची खोडी
दिलानं मारावी लगेच उडी
मी अशी कलंगडी काकडी ।।१।।

हिंमत द्या मला किंमत द्या
नका मोजू की मापानं छकडी
दिलानं मारावी लगेच उडी
मी अशी कलंगडी काकडी ।।२।।

अशी ताजी ताजी कवळी कवळी
खाण्यात चढा की टेकडी
दिलानं मारावी लगेच उडी
मी अशी कलंगडी काकडी ।।३।।

जोरा जोरी नको
नकोच पकडापकडी
दिलानं मारावी लगेच उडी
मी अशी कलंगडी काकडी ।।४।।

## १०

(चीज कष्टाचं तुमच्या करतीया, गोण्या धान्यानं घरात भरतीया... सोडला त्यो रस्ता बरंच हाय, हिचं बी म्हणणं खरंच हाय... तुम्ही ऐकावं, पाव्हणं ऐकावं...)

चला चला धनी तुम्ही आडतीला चला
गहू जवारी आडतीत घाला
भाव बघा कसा हा वधारला
धनी कष्टानं माझा सुधारला ।।धृ.।।

उगाचंच दारू पिऊन यायचा
घरादाराला शिव्या की द्यायचा
लेकराबाळांचं संपलेत आता हो हाल
शेत धंदा नव्यानं उभारला
धनी कष्टानं माझा सुधारला ।।१।।

माय-बाप त्याला कळंत नव्हतं
हुंड्याविना काही वळंत नव्हतं
शिकून सवरून नोकरी न्हाय
आता नवीन आशेनं सुधारला
धनी कष्टानं माझा सुधारला ।।२।।

सोस न्हाई मला त्या नोकरीचा
कशाचा हव्यास चाकरीचा
संगतीनं येईल मी खुरपायला
धनी कष्टानं माझा सुधारला ।।३।।

पिकवू रानात घामानं मोती
धान्यानं भरलीत पोत्यावर पोती
लक्षुमी आलीया घराला
धनी कष्टानं माझा सुधारला ।।४।।

## ११

(लिव्हा लिव्हा हो पोलीसदादा तुम्ही, फिर्याद लिहून घ्याना,
आता तुमीच न्याय की हो द्यावा... हिला तुमीच न्याय की हो द्यावा...)

माझे गोबरे गोबरे गाल
त्याचे झालेत हे हाल
उतावीळ गड्यानं चावून
कसे केलेत बघा की लाल

आता काय मी अन्, कसं सावरू
लपवू कसं न झाकू कसं
गालाची लाली ठळक दिसं
अन् हसतोय गडी खट्याळ
कसे केलेत बघा की लाल
माझे चावून गेलाय गाल ।।धृ.।।

म्या रागावले
तर म्हणतो कसा
हा लव्ह बाईट समजून चाल
माझे चावून गेलाय गाल ।।१।।

आता आईनं इचारलं तर
काय सांगाव म्या बरं
ह्याचं उत्तर तुम्हीच सांगाल
माझे चावून गेलाय गाल ।।२।।

ह्यो लालिमा घालवा
वैद्याला बोलवा
त्याला करामत खरी सांगाल
तुम्हीच चावलात माझा गाल ।।३।।

# १२

(किती बाय तुमी कामात गढता... आल्यावर थकून भागून पडता...
दाजी ऐकावा सल्ला हिचा ह्यो ऐका, नगा चालवू तुमी तुमचाच सदा हो हेका...)

कवा कवा वाटतंया मला
सोडूच नये तुम्हाला, राया
माणसं ठेवा कामाला, हापिसात
माणसं ठेवा कामाला ।।धृ.।।

तुम्ही न मी महाली बसू
गालातल्या गालात खुदकन हसू
टिचकी मारून गालाला
माणसं ठेवा की कामाला ।।१।।

झोपाळ्यावर झुलवा मला
वामांगी तुमच्या बसवा मला
चाकर चौऱ्या ढाळायला
माणसं ठेवा कामाला ।।२।।

राजंलोक कसं भरवायचे सभा
राजवाड्यातंच गाव सारा होईल उभा
हापिस आणा की वाड्याला
पाहिजेत ती माणसं कामाला ।।३।।

## १३

(अंग भिजलंया, मन भिजलंया... जरा गरमी येऊ द्या तिला
तुमचा चालावा सिलसिला हो पाव्हणं चालू द्या सिलसिला...)

पावसाळी हवा, तिचा झोंब गारवा
गरमा गरम भज्यांचा वास आला
कांदा मिर्चीचं बटाटं भजं खाऊ
तोंडाला चव जरा खमंग देऊ
चहा फक्कड होऊ द्या जोडीला
चाखलेला घोट घ्या गोडीला
माझा चाखलेला घोट द्या गोडीला ।।धृ.।।

आल्या आल्या सरी वरचेवरी
गाडीवर गर्दी झाली बघा
आडोसा शोधा न रहा की उभा
वास खमंग येऊ द्या नाकाला
चहा फक्कड होऊ द्या जोडीला
चाखलेला घोट द्या गोडीला
माझा चाखलेला घोट घ्या गोडीला ।।१।।

आलु गरगरीत भजी कुरकुरीत
तिखट मिरची कांद्याला बरची
मसाला सगळा टाकावा
पाणी सुटलयं आता तोंडाला
चहा फक्कड होऊ घ्या जोडीला
चाखलेला घोट घ्या गोडीला
माझा चाखलेला घोट घ्या गोडीला ।।२।।

भज्याचा वास, मातीचा सुवास
वाफाळला चहा उकळावा
गाळून कपात येईल हातात
हातात हात माझा खोडीला
चहा फक्कड होऊ द्या जोडीला
चाखलेला घोट द्या गोडीला
माझा चाखलेला घोट द्या गोडीला ।।३।।

## १४

(हँडसेट तुमचा झालाय जुना, येऊ द्या एखांदा नव्यात नवा,
तुमच्या जोडीला हिलाबी द्यावा, गेम जोडीनं खेळत ऱ्हावा...)

वॉटस् ॲप वॉटस् ॲप खेळू आपण
इंस्टाग्रामवर भेटू आपण
फेसबुक अकाऊंट उघडूया
तिथं दोघंबी खुशाल बागडूया ।।धृ.।।

तुमच्या आयडीचं फोटू अपलोड करा
लाईक अन् कमेंटनी इनबॉक्स भरा
पुन्हा पुनांदी उघडून वाचू या
तिथं दोघंबी खुशाल बागडूया ।।१।।

कधी कुठं आपण फिरायला जाऊ
निसर्ग मस्त मस्तीत येऊ
फेसबुक लाईव्ह मग करूया
तिथं दोघंबी खुशाल बागडूया ।।२।।

इंस्टाग्रामवर फॉलोवर येतील बघा
वाट आपल्या इव्हेंटची पाहतील तवा
थोडी वाट बघाया लावू या
तिथं दोघंबी खुशाल बागडूया ।।३।।

आता म्हणं आहो ट्विटर आलं
मोठ मोठ्या लोकांचं खातं निघालं
खातं उघडून चिव चिव करूया
तिथं दोघंबी खुशाल बागडूया ।।४।।

## १५

(वरवाच लावला व्हता हिनं... चरवीत देत व्हता तुमी देणं,
असं काय झालं... दुभतं जनावर आटलंय का, दुसरंच कुणीतरी
भेटलंय का आ ऽऽऽ ------ भेटलय का...)

किती दिस झालं तुम्ही फिरकला न्हाय
गावात तुमचा पत्त्याच न्हाय
शहरात कुणीतरी गावली काय
हिकडं बी तुमचं पडू द्या की पाय
कवातरी तुमचं पडू द्या की पाय ।।धृ।।

एक काळ व्हता तुमी रोज येत व्हता
येण्या जाण्याचा सपाटा चालला
तुमी पोटभर मेवाही खाल्ला
आता नवीन मिठाई रुचली काय
कवातरी तुमचं पडू द्या की पाय ।।१।।

आवं दाजीबा, ध्यानात घेवा
जुनं ते सोनं जरा आठवून पहा
इथलं दिस कसं सोन्याचं व्हतं
हे इसरून चालायचं न्हाय
कवातरी तुमचं पडू द्या की पाय ।।२।।

एक पाखरू हित वाट बघतंय
घरट्यात एकटंच फेऱ्या मारतंय
रस्त्याला तुमच्या लागल्यात डोळं
अर्ध्या वाटतं सोडायचं न्हाय
कवातरी तुमचं पडू द्या की पाय ।।३।।

## १६

(हिच्या दिलाचं फूल, तुम्हा पडलीया भूल
ते भाळून तुमच्यावर गेलं, तुमी अलगद उचलून
नेलं, त्याचं पुढं तुम्ही काय गेलं, पाव्हणं पुढं कुणी काय केलं.)

मोगऱ्याचा गजरा, अबोलीचा गजरा
जाई जुईचा गजरा आणावा
तुमच्या हातानं हातानं हातानं
केसात माझ्या माळावा
राया अलगद केसात माळावा ।।धृ।।

जवा तुम्ही जाता आठवडी बाजारा
फुलांच्या बाजारात चक्कर मारा
सुगंधावरून कळावा
गजरा कोणताय तो, सुगंधा वरून कळावा
माझ्या केसात अलगद माळावा ।।१।।

एक तिथं हाय माळीण गुणी
फुलांचे गजरे ठेवी गुंफूनी
माझा निरोप तिला तुम्ही सांगावा
अलगद केसात माळावा ।।२।।

दिस असू द्या की असू द्या रात
गजऱ्याचा सुवास घरादारात
भाव ह्यो प्रेमाचा जुळावा
अलगद केसात माळावा ।।३।।

जर मी कधी रुसले तुम्हावर
सांगून ठेवते युक्ती जबर
तुमच्या हातात गजरा असावा
अलगद केसात माळावा ।।४।।

(एकाच रस्त्यानं कसं जायचं, कटाळवाणं ते किती व्हायचं,
ही गुलजार, नारी हुशार, काढतीया उपाय खमके,
रावजी, देखो ना तुम आजमाके ---- )

पिरतीचे येगळे येगळे प्रकार
सारे आपण आजमाऊन पाहू
त्याचं एक एक रोपटं वाढवू
चला इश्काची नर्सरी काढू
राया चला इश्काची नर्सरी काढू ।।धृ.।।

काही काही रोपं लईच सान
तरी सुगंधाची ते खाण
अशा क्षणांच अत्तर पाडू
चला इश्काची नर्सरी काढू ।।१।।

काय ती पानं काय ती फुलं
बघंत रहावं छान
सुंदर रोपांना कुंडीत वाढवू
चला इश्काची नर्सरी काढू ।।२।।

काही झाडं सजना सुंदर न्हाई
न्हाई त्यांना सुवास
पर सुखाच्या गारव्याला भिडू
चला इश्काची नर्सरी काढू ।।३।।

## १८

(मोबाईलची रिंग बाय वाजली की काय, जिवाला हिच्या
ह्यो धसकाच हाय, बोलेल तुमच्याशी दमानं घ्या,
तुम्ही हिला फक्त मिस कॉल द्या... पाव्हणं मिसकॉल द्या.)

राया तुम्ही मला मिसकॉल द्यावा
फोन नगा लावू बघा कावंल बाबा
मी येईन गच्चीवर, चढून भरभर
पायऱ्या तुमच्याशी बोलाया
मग तासन् तास बोलण्यात जावा
अहो तासन् तास बोलण्यात जावा ।।धृ.।।

तुम्ही माझं हाल काही इचारू नगा
भेटाया यायचं तेवढंच बघा
आता मला राहावंना, अजिबात करमंना
कामात मन काय लागंना
मला तुमचा मुखडा दिसावा
मग तासन् तास पाहण्यात जावा
अहो तासन् तास बोलण्यात जावा ।।१।।

तुम्ही तिथं कसे हायंत बरे ना
खाताय की नाही का सुकलाय ना
असं नगा करू, शपथ हाय
जिवाला घोर लागून ऱ्हाय
साजन सुखात सदाच असावा
मग तासन् तास हसण्यात जावा
अहो तासन् तास बोलण्यात जावा ।।२।।

बोलले ना फोनवर मग म्या निवांत
झोप बी लागंल तवाच शांत
भेट अर्धी व्हतीया फोनवर
मधाळ शब्द ते कानावर
भेटीचा योग लवकर यावा
अनं तासन् तास भेटण्यात जावा
अहो तासन् तास बोलण्यात जावा ।।३।।

## १९

(आतल्या आत बसू नका कच खात, दिलखुलास बोलायला पाहिजे, दाजी तुम्ही दिलास सांभाळलं पाहिजे दाजी तुमी दिलास...)

किती तापलाय तुम्ही दुःखानं धनी
कुणा काहीच सांगता येईना
जिंदगानीचा उन्हाळा झालाय
ह्यो ऋतू काही निघून जाईना ।।१।।

म्या झालीया बघा वळवाची सरी
भिजून घ्या लवकरी न सजना
भिजून घ्या लवकरी ।।धृ।।

तुम्ही खंबीर गडी हिम्मतवालं
खचून जायचं न्हाईना
तुमची लाडाची, लाडाची
लाडाची हाय मी खरी
भिजून घ्या लवकरी ।।२।।

पार उतरून गेलाय मुखडा ह्यो तुमचा
यावर रामबाय उपाय हायना
मी सुखाची जादू करणारी परी
भिजून घ्या लवकरी ।।३।।

२०

(किती वर्षाची मनात आस, रातदिन हिला हो होत्यात भास...
कसले बाय... कसले ... आम्हाला नाही सांगशील तरी
दाजीसनी बोल तरी, एकदा तरी ... एकदा तरी)

हौस समदी ही माझी फिटली
सारी दुनिया म्या कवाच फिरली
एकंच आस बघा मनी ऱ्हायली
आपली वरात काढावी
राया रथातनं वरात काढावी ।।धृ.।।

तुमच्या जोडीनं रथात बसून
गावभर वाटतंय मिरवावं
तुम्ही गावचं पुढारी, शानंच भारी
मला संगतीनं गावात फिरवावं
माझी हौस आता तुम्ही पुरवावी
आपली वरात काढावी ।।१।।

बाया बापड्या बोटं घालतील
तोंडात पाहून जोडीला, पाहून आपल्या जोडीला
तुम्ही करताल नेहमीच्या तुमच्या खोड्या
हात लावताल माझ्या साडीला
तुमच्या म्हतारीनं, तुमच्या म्हतारीनं
इतक्यात खोडी ही पहावी
आपली वरात काढावी ।।२।।

साजशृंगार करून बसीन
लाजंत तुमच्या शेजारी
मग म्हणतील कसं
काय नशिबवान ह्यो पुढारी
देखणी किती आणलीया नवरी
तुम्ही नजरेनं नजर काढावी
आपली वरात काढावी ।।३।।

वरातीपुढं बँडबाजा वाजं
वरातीत नाचतील शंभर पोरं
हजाराची लड कुणी पुढं उडवंल
फटाक्याच्या आवाजानं म्या घाबरंल
हळूच कुशीत शिरावी तवा
तुमच्या प्रीतीच्या कुशीत शिरावी
आपली वरात काढावी ।।४।।

## २१

(हरवली मजा, जगणं झालंय सजा, झालंय सजा
जरा जत्रंत फिरायला न्यावं, हिच्या संगतीनं तुमी बी जावं...)

आधी गावागावात असायची जत्रा
आताशी काळ ह्यो बदलला जरा
सारी मजाही तशीच येती
कुणी म्हणत्यात उत्सव मेला
कुणी म्हणत्यात आनंद नगरी ।।धृ.।।

दोघं आपण सांजच्याला जाऊ
सारी दुकानं फिरून घेऊ
मला खरेदी करायची सारी
कुणी म्हणत्यात उत्सव मेला
कुणी म्हणत्यात आनंद नगरी ।।१।।

मोठ मोठे पाळणे, किती हे झोळणे
डिस्को डांस मध्ये बसून बघू
सारीच खेळणी हायती भारी
कुणी म्हणत्यात उत्सव मेला
कुणी म्हणत्यात आनंद नगरी ।।२।।

आनंद घेऊ, चनाजोर खाऊ
मसाला पापड, भेळपुरी घेऊ
बरफ गोळा, गरमी भारी
कुणी म्हणत्यात उत्सव मेला
कुणी म्हणत्यात आनंद नगरी ।।३।।

आठवण इथली साठवून घेऊ
आपल्या नावाचं मणिबी वऊ
चार दिसाला इथली वारी
कुणी म्हणत्यात उत्सव मेला
कुणी म्हणत्यात आनंद नगरी ।।४।।

## २२

(अगं अगं असं काय म्हणतीस बाय, सांग ना
कुठं तुला जायाचं हाय... सांग... आम्हासनी सांग)

सण आला वर्षाचा दसरा न दिवाळी
चला जाऊ आपण खरेदीला
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।धृ.।।

आज किनई तुम्ही सुट्टी हो काढा
हापिसात सायबाला अर्जी धाडा
मनवीन रूसलीया लाडीला
लिव्हा की ... मनवीन रूसलीया लाडीला
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।१।।

शहरात मोठ्या बाजारी जाऊ
शोरुम चांगलं शोधून काढू
टेकून बसू छान खुर्चीला
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।२।।

तुम्ही मला द्यावी पैठणी साडी
पदरावर मोराची जोडी
रंग डाळिंबी शोधियला
म्या रंग डाळिंबी शोधियला
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।३।।

धारवाडी काठाचं धोतर दावा
वर त्याच्या तुम्ही हो पंचा घ्यावा
सदरा मॅचिंग साडीला
माझ्या सदरा मॅचिंग साडीला
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।४।।

ववाळीन तुम्हा मी नेसून लुगडं
डोईवर टोपी तुमचं देखणं रूपडं
पिरतीची ववाळणी गाली द्या
मी घेईन नऊवारी लुगडं
तुम्ही घ्यावं धोतर जोडीला ।।५।।

## २३

(गरगर गिरकी, मारा की फिरकी, संगतीनं पाळण्यात झुलावं, दाजी संगतीनं पाळण्यात झुलावं, तुमच्या संगतीनं हिचं दिल खुलावं... दिल खुलावं...)

लई दिस झाले कुठ गेलोच न्हाय
घराच्या बाहेर पडलोच न्हाय
एक येगळा दिस की हो घालवू
राया एस्सेल वर्ल्डला जाऊ
अन् वॉटरपार्क बी पाहू ।।धृ।।

गरमीनं हैराण झालीया मी
घामाच्या धारानं भिजलीया मी
पाण्यातले खेळ, खेळातलं पाणी
दिस कसा थंडगार भिजवू
राया एस्सेल वर्ल्डला जाऊ
अन् वॉटरपार्क बी पाहू ।।१।।

थरार मजा, आनंद घेऊ
धिटाईनं साऱ्या खेळण्यात बसू
भीती वाटलीच तर, एकमेकासनी धरू
डोळ्यांची पाखरं मिटून घेऊ
राया एस्सेल वर्ल्डला जाऊ
अन् वॉटरपार्क बी पाहू ।।२।।

मुंबईला हे सारं पाहू
पुढंच इमॅजिकाला जाऊ
वय इसरुन सारी मजाही घेऊ
पुनांदा एकदा बालपणी जाऊ
राया एस्सेल वर्ल्डला जाऊ
अन् वॉटरपार्क बी पाहू ।।३।।

२४

(हिच्या दिलाचा पारवा, घुमतोय सारखा, कवाचा तुमच्या फांदीवर,
पाव्हणं फांदीवर, घरटे बांधतोय दांडीवर तुमच्या, घरटं बांधतोय दांडीवर...)

तुम्ही मला घातली मागणी
सांगा कशी मी न्हाई म्हणू
म्या बी भाळले व्हते तुम्हावर
पण कस नि कुणाला सांगू
चला आता लगीन करू
राया संसार होऊ द्या सुरू ।।धृ.।।

राजबिंड ते रूपडं तुमचं
अंगानं भरलाय बांधा
मिशीला देताय पिळ तुमी जवा
माझा लईच होतोया वांदा
कसनुसं होतंय, भेटावं वाटतंय
मन माझं लागतंय गरगरू
राया संसार होऊ द्या सुरू ।।१।।

नजरेनं तुम्ही बघताय रोखून
पिऊन टाकताय इतक्या दुरून
नजर माझी लाजंनं वाकली
तुमी राया तवाच धाड ही टाकली
नार ही खपकन कवाच वाकली
जिवाची झालीया तगमग सुरू
राया संसार होऊ द्या सुरू ।।२।।

मन माझं आता कुठंच ऱ्हाईना
फिरायला आता उगाच जाईना
तुमची मूर्ती काळजात पुजलीया
आता देवावर समदा हवाला
तुमी आता येळ उगा दवडू नका
सनईचे सूर आले आले कानावरू
राया संसार होऊ द्या सुरू ।।३।।

## २५

(लगबग झाली, पहाट आली... हिची कसली घाई चाललीया,
नार ठरवून काहीतरी बोललीया...)

सोडा साखरझोप, उठा ना राया
कवळ्या उन्हात जावं बसाया
थोडा योगा बी तुमी हो करावा
घाला सूर्या नमस्काराला
करंल म्या बी उठल तुमच्या जोडीला
नव्या नव्या या योगासनाला ।।धृ.।।

मोजावं बारा नमस्कारा
पहा सूर्याच्या तेजाळ मुखड्याला
करंल म्या बी उठंल तुमच्या जोडीला
नव्या नव्या या योगासनाला ।।१।।

कपालभाती न अनुलोभ विलोम
उद्गीथ प्राणायाम भ्रामरीला
करंल म्या बी उठल तुमच्या जोडीला
नव्या नव्या या योगासनाला ।।२।।

करा शीर्षासन सर्वांगासन
नगा झोपू पण शवासनाला
करंल म्या बी उठल तुमच्या जोडीला
नव्या नव्या या योगासनाला ।।३।।

## २६

(रोज रोज मवाली छेडतेत हिला, रूपाचा खजिना अहो लुटण्याला,
थकलीया नार, गुलेगुलजार हिनं उपाय सुचवला ऐका... पाव्हणं...)

शेत आलं राखणीला, गोफण फिरवा
राया तुमी पाखरांची मस्ती कीं जिरवा
मग सारा मेवा, तुम्हीच खावा
दमानं, तुमच्या सवडीनं
दाणा दाणा हा भरलाय गोडीनं
दाणा दाणा हा भरलाय गोडीनं ।।धृ.।।
आधी चार मास घ्या मेहनत
करा तुम्ही चांगली मशागत
बीज आता पेरा, धीर तुम्ही धरा
सरीवर सरी जरा कोसळू द्या
आभाळ बरसलं दौडीनं
दाणा दाणा हा भरलाय गोडीनं ।।१।।
हळू हळू तुम्ही आस्वाद घ्यावा
व्हटावर मेवा अलगद ठेवा
स्पर्शानं काटा फुलंल तवा
भरल्या नदीला तरावं व्हडीनं
दाणा दाणा हा भरलाय गोडीनं ।।२।।
मातीची पारंख करून घ्या की
चिक्कन असू द्या सुपीक जाती
काटंकुटं नि गवत उपटावं
मग पीक कसं तरारंल जोमानं
गोण्या भरा की गाडीगाडीनं
दाणा दाणा हा भरलाय गोडीनं ।।३।।

२७

(काही नको हिला, तुमी संगं चला, मनातली इच्छा सांगल तुमाला
ऐका दाजीबा, काय म्हणतीया ती तिला न् , कानं लावा तोंडाला तिच्या,
तुमचा कान लावा तोंडाला.)

आज रजिस्टरी हापिसाला
चला बरं जाऊ भराभर
तुमची दौलत माझ्या नावावर
करा दौलत माझ्या नावावर ।।धृ.।।

नगं शेती नं वाडी
गाडी नं घोडी
नाव लावा मंगळसूत्रावर
करा दौलत माझ्या नावावर ।।१।।

वाडा नको ना बंगला नको
नकोच तुमची तिजोरी बी
नाव माझं तुमच्या दिलावर
करा दौलत माझ्या नावावर ।।२।।

आज लगीन करू
नवं जीवन सुरू
पाय माझं जणू आज चंद्रावर
करा दौलत माझ्या नावावर ।।३।।

## २८

(शेताची करणी, कामाची भरणी, उसंत मिळतीया कुणाला
नका बाई गडबड, घाई नि बडबड, सावरून धरा तुमी मनाला)

रान आलं पेरणीला
बिगी बिगी चला
बियानं सारं निवडून घ्यावा
जरा अंतर ठेवा राया हो
अशी गडबड घाई नका हो ।।धृ.।।

थोडं रुजू द्या बियानं
वाट बघावी तवर गुमानं
अंकुर फुटून तरारू लागंल
पीक मग कस जोमानं वाढल
त्याला कणीस धरू द्या अहो
अशी गडबड घाई नका हो ।।१।।

भरलं कणीस डवरू द्या
दाण्यादाण्याला आत हो भरू द्या
वझ्यानं जवा रोप हे वाकंल
आपल्याच भारानं जवा ते थकंल
तवा तुमी कणसाला हात द्या हो
अशी गडबड घाई नका हो ।।२।।

लगेच कणीस तोडू नगा
दाण्याला मोकळं काढू नगा
जरा आंजारा तुमी गोंजारा
दाण्या दाण्याला आपलं वाटा जरा
मग खुशाल तोबरा भरा हो
अशी गडबड घाई नका हो ।।३।।

## २९

(असं काय करताय, फेफरं हो भरताय
थरथर थरताय कशाला, दाखवून घ्या तुमी डॉक्टरला...२)

पिरतीचं अभ्यास करून सारे
आता मी डाक्टर झाले
किती वर्षांचे मरीज राया
जुनेजुनाट मरीज राया
चुटकीत बरे मी केले
आता खोललाय इश्काचा दवाखाना
तुम्ही उद्घाटनाला या ना
माझ्या पिरतीचे औषध गोड गोड
तीन येळेला जरूर घ्या ना ।।धृ.।।

कुणाला कुणी देतंय दगा
येड्यागत मग वागतंय बघा
दिसलं मजनू बनून फिरताना
माझ्या दवाखान्यात त्याला आणा ना
तीन येळेला औषध घ्यावा ना ।।१।।

कुणीतरी बाय पाच वरीस झालं
पोरीच्या मागे चालू लागलं
दुसऱ्या संगंच लगीन होताना
माझ्या दवाखान्यात त्याला आणताना
तीन येळेला औषध घेता ना ।।२।।

## ३०

(हिची किती प्रीती हो तुमच्यावरती, लाजून जातीया सांगायला...
खाणं न पिणं सोडून सारं, तुमासाठी झुरणं सांगायला...)

उपमा द्यावी कशाची तुम्हाला
काय बी मजला सुचंना
तुमी श्रीखंड राया नि मी व्हते पुरी
तुमाविना घास काही रुचंना ।।धृ.।।

जेवनात रस न्हाय, रोजंच उपाशी
पोट गेलं खपाटी कुणा दिसंना
प्रेमानं तुमच्या फुगतेय म्या बी
तुमी बी गोडवा टिपा ना
तुमाविना घास काही रुचंना ।।१।।

दुधाची भूक मग ताकावर
राग बघा लोकांच्या नाकावर
पोट भरलं मन भरंना
तुमाविन मला करमंना
तुमाविना घास काही रुचंना ।।२।।

किती दिसानं म्या दिला ढेकर
कोरभर जास्तीच खाल्ली भाकर
तुमच्या हातानं घास मला भरवा ना
अन् फेरारीची फेरी ही फिरवा ना
तुमाविना घास काही रुचंना ।।३।।

## ३१

(आला झाला पावसाळा, संपला की उन्हाळा
लाडिक हिचा हो चालतोय चाळा
भिजांव तुमी भिजावं, दिलात तिच्या खोल रुजावं, खोल रुजावं.)

कशाला खोलताय छत्री हो सजना
कवा तरी माझं ऐकावं
पावसाच्या सरी न झेलू अंगावरी
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।धृ.।।

झाडं व्हतील वले
येली बी वल्या
दव असं अंगावर फुलावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।। १ ।।

केस माझे वले
शिंपडीन थोडे
अंगावर मोती झेलावं
तुमी अंगावर मोती झेलावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।२।।

मन बी वलं
हे तन बी वलं
पायानं पाणी थोडं उडवावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।३।।

चिंब आता तुमी न
चिंब झाले म्या बी
चिंब मातीच्या गंधाला हुंगावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।४।।

ईज कडाडता जोरात अशी
जवळ करावी तुमची कुशी
म्या मिठीत तुमच्या शिरावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।५।।

पहिल्या पावसाची मजाच येगळी
गंमत घडतीया काहीतरी सगळी
सालभर आठवात रमावं
दोघं जोडीनं पावसात भिजावं ।।६।।

## ३२

(जे जे हिचं ते तुमचं हाय, तुमाविना म्हणं काहीच न्हाय
काय आर्जव करतीया बघा तरी, जरा थांबून दाजी ऐका तरी)

मी वयात आले, राया जवान झाले
तुम्हा आठवण देते बोलाची
सांभाळा, सांभाळा
सांभाळा दौलत मोलाची
राया दौलत माझी लाख मोलाची ।।धृ.।।

लई जनांची नजर
या दौलतीवर
तुमी बात करा सजना तोळ्याची
सांभाळा दौलत मोलाची
राया दौलत माझी लाख मोलाची ।।१।।

आई बाबा कडं
कुणी घालतंया मागणी
तयारी ठेवा तुमी लग्नाची
सांभाळा दौलत मोलाची
राया दौलत माझी लाख मोलाची ।।२।।

माप घ्या बोटाचं
अंगठी बनवा
साडी आणा की फुलं नि येलाची
सांभाळा दौलत मोलाची
राया दौलत माझी लाख मोलाची ।।३।।

## ३३

(चूल बी पेटली, तवाबी तापला, परात फिरतीया गोलम गोल
वास खमंग आला, दिलास खोका ... दाजी दिलास खोका)

पुरण पोळीचं जेवन करते
वर तुपाची धारंही धरते
तुमी दिलाची राणी मला म्हणा
अन् आपलीच ठेव तुमी जाणा ।।धृ.।।

सैपाक माझा लई चवदार
पोटातून जातंया दिलाच दार
मी ठोठावते उघडतो म्हणा
अन् आपलीच ठेव तुमी जाणा ।।१।।

दिसायला हाय मी सुंदर बाय
रंग गोरापान माझा बांधा काय
मी होईल राणी तुमी माझं राणा
अन् आपलीच ठेव तुमी जाणा ।।२।।

घरकाम सारं नेटानं करीन
तुमच्या स्वागता तयार राहीन
सांजच्याला लवकर येतो म्हणा
अन् आपलीच ठेव तुमी जाणा ।।३।।

मी सुखाचं दान पदरी देईन
दुख सार तुमचं वाटून घेईन
मला लाडानं मंजुळा म्हणा
अन् आपलीच ठेव तुमी जाणा ।।४।।

## ३४

(भलेभले हो सांगून गेले, रागात म्हणं हो रंक बी झाले
भल्याचा न्हाय त्यो राग न्हाय बरा, निगुतीनं घ्यावं दमानं जरा...
बरं का पाव्हणं, दमानं जरा...)

भराभरा वाहना पायात घालताय
तरातरा तुम्ही रागानं जाताय
कशाला धरताय असा अबोला
नाकावरचा राग तुम्ही सोडून द्यावा
मी तुमची बायडी शेवंता राया
लाडात येऊन जवळ घ्या ना
मिठीत माझ्या बिलगून जाना ।।धृ.।।

बघा ना तुमी एकदाच वळून बघा ना
जीव जडलाय हा तुमच्यावरी माझा ना
तुमी गेलात तर मी जेवायची न्हाय
उपाशी राहीन खायाची न्हाय
सुकंल तुमची राणी संगिनी
सुकले तर तुम्हाला आवडल का
म्या बोलायची न्हाय मग पटलं का ।।१।।

कुणी सुंदर प्रियेला सोडतंय का
बघा मन तुमचं बी वळतयं का
परतून याना, कुशीत घ्याना
जिवात जीव माझ्या आणा ना
सांगा की पावणं असं शोभतंय का ।।२।।

## ३५

(हिला लई हौस, बाजारात पाऊस फिरायला जावा तिकडं,
दोघं फिरायला जावा तिकडं...)

खाण्याची आवडी धन्यास गोडी
खवैया मिळाला गडी
भाजी बाजाराला जाऊन येऊ
न राया, ताजं ताजं माळवं घेऊ ।।धृ.।।

त्या बघा काकड्या
घेऊ नगा वाकड्या
सरळ छोट्या नि कवळ्या
जोडीला मिरच्या लवंगी बरं का
मेथीची जुडीही पाहू
न राया, ताजं ताजं माळवं घेऊ ।।१।।

पालकमाठ, दुधी हा ताठ
गवार दोडकं बटाटं
कांदे नि वांगे टमाट लाल
रताळी घोसाळी पडवळ
जुड्या कोथिंबीरीच्या चार घेऊ
न राया, ताजं ताजं माळवं घेऊ ।।२।।

आळूची पानं, सुरण, घेवडा
परवल, चवळी, भेंडी नि आवळा
कोहळा, डांगर भोपळा बावळा
कारलं पुदिना करडी भरडी
आलं लसून कडीपत्ता घेऊ
न राया, ताजं ताजं माळवं घेऊ ।।३।।

अशा साऱ्या भाज्या
आणु घरी ताज्या
मी करीन पदार्थ आवडीचे
पोटभर खावा नि विसावा घ्यावा
चांगलं आरोग्य कमवून घेऊ
न राया, ताजं ताजं माळवं घेऊ ।।४।।

## ३६

(तुम्ही लई हौशी, नव्या नव्याची गौशी, आयडिया लढविता भारी,
तुम्ही हिचं हो कारभारी, तुमी हिचं हो कारभारी...)

मंचक असा सजविला कुणी
सजना तुमची हौसच जुनी
रोज जवा तुमी थाट करता ना
मनात तो तो तुम्ही भरता ना
जोडी खुशाल राहू द्या आपली
न राया गुलाब मोगरी टोपली ।।धृ.।।

सायली गुलाब जाईजुई
पसरून गेल्या गाडीवरी
अत्तर शिंपडून खोली भर
फुग्यांना बांधून ठेवलंय वर
म्या दारात उभीच ठकली
जोडी खुशाल राहू द्या आपली
न राया गुलाब मोगरी टोपली ।।१।।

सांजच्याला तुम्ही तयारी केली
चकाचक दाढी नि आंघोळ झाली
कपाटातून साडी माझी काढली ना
ताटात बासुंदी बघा वाढली ना
घासाला पुरी मी मोडली
जोडी खुशाल राहू द्या आपली
न राया गुलाब मोगरी टोपली ।।२।।

रातराणी जरा लाजून आली
निशिगंधाला बिलगून गेली
साज तिचा सुगंध भरून घ्या
श्वासात गारवा पसरून द्या
म्या नाजूक प्राजक्ता झाली
जोडी खुशाल राहू द्या आपली
न राया गुलाब मोगरी टोपली ।।३।।

३७

(कितीबी राहिलात संगं हिच्या, मनात कामना हाय काय तिच्या...
समजून घ्या, उमजून घ्या... तिला वाजतगाजत घरामंदी न्या...)

बाशिंग बांधा कपाळी तुम्ही
कानात ठेवा अत्तर धनी
शेरवानी घाला न वऱ्हाडी आणा
लगीन करून घ्याना, मजला
संगतीनं तुमच्या न्याना ।।धृ.।।

घेऊ सात फेरे वचन हे खरे
जोडवी मासळी पायात बरे
डोरलं गळ्यात बांधा ना
तुमच्या नावाचं, धनी तुमच्या नावाचं
डोरलं गळ्यात बांधा ना
लगीन करून घ्याना, मजला
संगतीनं तुमच्या न्याना ।।१।।

हात माझा हातात घेऊन तुम्ही
होमात आहुती टाकावी धनी
म्या अर्धांगी तुमची हाय ना
सांगा, सांगा की धनी
म्या अर्धांगी तुमची हाय ना
लगीन करून घ्याना, मजला
संगतीनं तुमच्या न्याना ।।२।।

अंगात शालू रेशीम कोंदी
गळ्यात दागीनं हाताला मेंदी
हातात हात ह्यो घ्याना
राया तुमच्या हातात हात ह्यो घ्याना
लगीन करून घ्याना, मजला
संगतीनं तुमच्या न्याना ।।३।।

झाले की विधी जाऊ या आधी
घराकडे आता आपुल्या
माप भरलेलं वलांडू द्या ना
लक्षुमी म्हणून वलांडू द्या ना
लगीन करून घ्याना, मजला
संगतीनं तुमच्या न्याना ।।४।।

## ३८

(तुमी हाय जानेमाने पैलवान, रूबाब तुमचा मोठा मान
पर हे हाय जाईचं फूल, नगा होऊ द्या कसलीच भूल
दमानं... पाव्हणं दमानं...)

धसमुसळेपण कमी करा
शिंगार दमानं खावा जरा
नार नाजुक हाय मी शेलाटी
मोरावानी गळा बारीक कटी
मर्जी बसलीया तुमच्या वरी
न माझी खरोखरी
राया माझी खरोखरी ।।धृ.।।

आखीव बांधा रेखीव मुखडा
चांदण्याचा जणु तो तोडलाय तुकडा
डोळ्यांची नजर हरीण झाली
लाज बघा पापणीच्या पंखाखाली
मर्जी बसलीया तुमच्या वरी
न माझी खरोखरी
राया माझी खरोखरी ।।१।।

तुम्हाला बघून लाली गाली
काट्यांनी अंगावर गर्दी केली
मनात भीती धडधड छाती
श्वासाचा भाता खालतीवरी
मर्जी बसलीया तुमच्या वरी
न माझी खरोखरी
राया माझी खरोखरी ।।२।।

हळूवार तुम्ही मला, जवळ घ्याना
अंगाला अंग हे भिडू द्या ना
लाजाळू झाड मी गोळा जरी
थोडा इसावा घ्यावा तरी
मर्जी बसलीया तुमच्या वरी
न माझी खरोखरी
राया माझी खरोखरी ।।३।।

## ३९

(हिला ऐशीतैशी समजू नगा, धीराची लई ही पोर हाय बघा... नगा वाकड्यात जाऊ तिला डिवचून पाहू... नगा की कवाच ठरवू असलं वंगाळ नगाच ठरवू...)

जीव ववाळला हाय मी तुमच्यावर
दगाच देऊन बघा, तुमी दगाच देऊन बघा
कोल्हाट्याची पोर हाय मी
सोडणार न्हाई तुम्हा ।।धृ.।।

जात पुरुषाची बाहेरख्याली
घरात किती बी मिळालं तरी
नवंनवंच खायला घ्यावा
कोल्हाट्याची पोर हाय मी
सोडणार न्हाई तुम्हा ।।१।।

कुणाकडं कधी बघायचं न्हाय
ताटात वाढलेलं खायाचं हाय
बुऱ्या संगतीनं बिघडून जावा
कोल्हाट्याची पोर हाय मी
सोडणार न्हाई तुम्हा ।।२।।

सारं घरदार सोडलंय की
तुमच्याशी नातं जोडलंय की
व्हा मैनेचा लाडका रावा
कोल्हाट्याची पोर हाय मी
सोडणार न्हाई तुम्हा ।।३।।

४०

(कोकीळ गाणं गातोया छान... आंबराईत ह्या आंब्याला मान...
वसंत आलाया, फुलवून गेलाया, बसा जरा गोडी चाखा...
दाजी तुम्ही हो गोडी चाखा...)

आंब्याची आडी पिकल्याची गोडी
रसाळी खायला यायचं हां
संगतीला केलीया पुरणाची पोळी
भजी कुर्डया खाऊन जायचं हां ।।धृ.।।

आज खूप जण हो जेवायला येतील
तुम्हाला बाबा सांगावा देतील
मी वाट पाहीन, येळेवर यायचं हां
भजी कुर्डया खाऊन जायचं हां ।।१।।

पंगत बसंल, रंगत वाढल
कुणीतरी लग्नाचा इषय काढल
तुमी पसंती सांगण्या, थोड हसायचं हां
भजी कुर्डया खाऊन जायचं हां ।।२।।

मग तुमच्या घरचे बोलाया येतील
लगीन पक्कं करून जातील
दिवाळीला बार उडवून द्यायचा हां
भजी कुर्डया खाऊन जायचं हां ।।३।।

## ४१

(नारीचं नटणं, सुंदर वाटणं, दागिनं खुलत्यात कितीतरी,
हिला आणून द्या हो वरचेवरी, वरचेवरी...)

पाय माझे नाजूक, कवळे साजून
चाळ खूप खुलतील घेऊन द्या
छमछम आवाजाला ऐकून या
तुमी छमछम आवाजाला ऐकून या ।।धृ.।।

अंगणात जवा मी येईन कवा
सडा रांगोळी काढायला
नजरेच्या कोपऱ्यानं बघून घ्या
छमछम आवाजाला ऐकून या ।।१।।

कपडे धुवून गच्चीवर जाईन
वाळंत घालण्या थांबून ऱ्हाईन
तुमच्या गच्चीवरून निरखून घ्या
छमछम आवाजाला ऐकून या ।।२।।

आज किनई हाय ना आठवडी बाजार
मैत्रिणीसोबत भाजीला जाणार
कानोसा घेत तुम्ही मागे या
छमछम आवाजाला ऐकून या ।।३।।

सोमवारी मी मंदिरात जाईन
शंकराला बेलफूल वाहून येईन
मी मागीन तुम्हाला, तुम्हीबी मलाच मागून घ्या
छमछम आवाजाला ऐकून या ।।४।।

## ४२

(अ... आ... इ... ई... शिकायची घाई... आता तरी मन लावून शिका, ह्या मास्तरनीचं ऐका, तुमी ह्या मास्तरनीचं ऐका...)

तुमी लई शिकलात, मोठ्ठे झालात
पर पोरीच्या मामल्यात हुकलात
माझ्या पिरतीच्या शाळेत दाखल व्हा
तुम्ही इश्काची बाराखडी शिकून घ्या ।।धृ.।।

असं कसं तुम्ही मागं हो राहिलात
आज तुम्ही शेजारच्या राणीला पाहिलात
'इश्श' तुम्हीच लाजलात, असं कसं वागलात
ईदेचा चांदवा पाहून घ्या
तुम्ही इश्काची बाराखडी शिकून घ्या ।।१।।

उठा तुम्ही आता दाढी चकाचक करा
ऊसाच्या शेताचा रस्ता धरा
एकटीला बघून चिठ्ठी द्या ना तुम्ही
ऐटीत गाडीवर निघून जा
तुम्ही इश्काची बाराखडी शिकून घ्या ।।२।।

ओठात गाणं गुणगुण करा
औट घटका हाती गजरा धरा
अंदाज घेऊन तिच्या केसात माळा
अः (अहा) तुम्ही व्हाल तिचं राजा
तुम्ही इश्काची बाराखडी शिकून घ्या ।।३।।

## ४३

(रूपाला उपमा शोधू नका, सापडणं न्हाय हे
ध्यानी ठेवा... एखादं फुलतयं, युगात झुलतय,
तसंच हळवं फूल समजा... हिला तसंच हळवं फूल समजा...)

नटनार किती ह्या नारंग्या
कुठं बी तुम्ही फिरून या
लाखात देखणी, दाळ मी मखणी
इंद्राची जशी ती इंद्राणी
चंद्राची सुंदर रोहिणी
मी शुक्राची ... मी शुक्राची
मी शुक्राची चमचम चांदणी ।।धृ.।।

नजर लावू नगा
मला एकटक पाहू नगा
नजरेनं गिळत्यात कुणी न
लवू द्या पापणी... पापणी
मी शुक्राची चमचम चांदणी ।।१।।

मी भराला आलेलं रान
टंच कणसांनी भरलंय छान
पडंल टोळधाड, पाखरही द्वाड
कराया आलीया राखणी... राखणी
मी शुक्राची चमचम चांदणी ।।२।।

ताबडतोबीनं निर्णय घ्या
बोलाचालीनं समदं ठरवून द्या
मला मागणीची लागलीया रांग
लग्नाची करावी आखणी... आखणी
मी शुक्राची चमचम चांदणी ।।३।।

## ४४

(कसली घाय, तुम्हासनी हाय, जरा बी तुम्हाला थांबायचं न्हाय...
प्रवेश बंदीची पाटी हाय वाचा की ... प्रवेश बंदीची पाटी हाय...)

समद्यांम्होरं हात धरायचा न्हाय
नाद खुळा असा करायचा न्हाय
आय माझी कावंल, बाप माझा धावंल
वय अजून अठरा व्हायाचं हाय
दमाधिरानं समदं घ्यायाचं हाय ।।धृ.।।

जरा कळ काढा, थोडं दिस थांबा
आताशी झाडाला लागलाय आंबा
अजून कोय बी धरायची हाय
दमादमानं समदं घ्यायाचं हाय ।।१।।

म्या निवडलं तुम्हाला मर्जीनं
सारं घालवू नगा घाईगर्दीनं
हळूहळू म्या घरात सांगणार हाय
दमाधिरानं समदं घ्यायाचं हाय ।।२।।

तुम्ही कामावर आपल्या रुजू की व्हा
दोघासनी रहाया फ्लॅट बी घ्या
तुमची नवरी मी नक्की व्हणार हाय
दमाधिरानं समदं घ्यायाचं हाय ।।३।।

## ४५

(सणाची शोभा, आनंद उभा उंबऱ्यात मागणी करतीया,
हात हातात तुमचा धरतीया...)

सुवासिनीचा सण ह्यो आला
संक्रांत तिळगुळ घ्या ना
हसतं ऱ्हावा न गोडगोड बोला
तुम्ही शिंगार माझा पहा ना
तुमच्या नावाची पुजलीयात सुगडी
आज मला घेऊन द्या तुमी बुगडी ।।धृ.।।

वसा बी घेतला हे वाण मी पूजलं
सुगीचं धान्य सुगड्यात टाकलं
दाळ हरभरा, बोरं, उसाचा फेरा
हळदी कुंकू की लावता लावता
कुणी म्हणलं की दादल्याचं नाव घ्या
घेत उखाना घातली फुगडी
आज मला घेऊन द्या तुम्ही बुगडी ।।१।।

आज मी टिळा तिळाचा लावला
तिळगुळ पोळीचा निवद दावला
हळदी कुंकवाला बोलावल्या बाया
अन् ठेवलाय अत्तर फाया
अत्तरदानी गुलाबदानी वाणाचं ताट हे सजलं
काळी चंद्रकळा, घेऊन द्या मज लुगडी
आज मला घेऊन द्या तुम्ही बुगडी ।।२।।

## ४६

(कसली किमया केलीत राव, तुम्हावर पुरती भाळली की नार...
खरंच न्हाय... आता हिच काय खरंच न्हाय...)

दारापुढं दार, मधे गल्ली छोटी फार
खिडकी मधून बघताय सारं
नहाल्या केसांना सुकवंत बसले
तुम्ही तिकडून गालात हसले
अन् इशारे केले चार
आवं पगळली पगळली पगळली ही नार ।।धृ.।।

कसे बरे हायना, तुमी बरे हायना
रुबाबदार गडी खरचं व्हय का
अन् चिकाटी तुमच्यात फार
आवं पगळली पगळली पगळली ही नार ।।१।।

किती वर्ष झालं म्या भाव नाही दिला
पर तुमी हट्ट तुमचा सोडला न्हाई
थेट काळजाला भिडलाय वार
आवं पगळली पगळली पगळली ही नार ।।२।।

आता मला बी तुम्हासनी बघावं वाटतंय
पिरतीचं गुळपीट जुळाया लागलंय
औंदा करूया दोनाचं चार
आवं पगळली पगळली पगळली ही नार ।।३।।

४७

(काय बाय तुमी हो केलं हिला, कवाचा धरलाय हिनं अबोला...
कसा काढावा राग, सांगा काढावा राग...)

तुमी जावा तिकडंच, मी बोलनार न्हाय
तुम्हाला माझी काळजीच न्हाय
तुमी फैसला आत्ताच सुनवा
मला मनवायचं तसं हो मनवा ।।धृ.।।

किती बी लावली लाडी गोडी
पगळायची न्हाय मी जरा बी थोडी
ठोस प्लॅनिंग काहीतरी बनवा
मला मनवायचं तसं हो मनवा ।।१।।

उगा झुलवताय मी बघतेय ना
कुणा भुलावताय ओळखते ना
फंडा चालवा की नवखा
मला मनवायचं तसं हो मनवा ।।२।।

कवा बाय तुमी खरं बोलणार
भायेर तोंड घालणं टाळणार
आधी तुमी सुधरून दाखवा
मला मनवायचं तसं हो मनवा ।।३।।

## ४८

(पिरतीचं रसायन कुणाला कळलं, कळलं त्याला तरी का वळलं...
तुमची अजब हाय, कहानी अजब हाय, रीत गजब हाय, तुमची गजब हाय...)

आला श्रावण सरी ह्या बरसल्या
विरहिणी किती प्रेमा तरसल्या
झुले बांधलेत गावागावात
तुमी बाहूंचा झुला हो झुलवा
मला प्रियतमा म्हणून बोलवा ।।धृ.।।

किती वर्षाचं हो प्रेम आपलं
आता नक्कीच झालंया बघा
माझ्या जिवाची खळी ही खुलवा
तुमी बाहूंचा झुला हो झुलवा
मला प्रियतमा म्हणून बोलवा ।।१।।

आपल्या पिरतीची चर्चा बघा
साऱ्या जिल्ह्यात गेली पसरून
इचारलं कुणी ना मान डोलवा
तुमी बाहूंचा झुला झुलवा
मला प्रियतमा म्हणून बोलवा ।।२।।

आता हाय ते हाय न्हाय घाबरायचं
सरळ सगळ्यांना सांगायचं
समदे संशय दूर तुम्ही पळवा
तुमी बाहूंचा झुला झुलवा
मला प्रियतमा म्हणून बोलवा ।।३।।

४९

(ध्यान हो द्या तुम्ही हिच्यात फक्त, संगतीनं रहायचं दोघांनी मस्त,
गुलूगुलू करत ऱ्हावा... मैना राघुवानी मेवा खावा)

तुमचं माझं लई जुळतं
पाहून लोकांच्या मनी जळतं
तिकडं ध्यानंच द्यायाचं न्हाई
आपलं गुळपीट चालू द्या बाई ।।धृ.।।

तुमी जवा माझ्या कानाशी येता
हळूहळू काही मनातलं सांगता
माझ्या गालावर येतया हासू
लोकं करत्यात कानी फुसूफुसू
तिकडं ध्यानंच द्यायाचं न्हाई
आपलं गुळपीट चालू द्या बाई ।।१।।

गाडीवर जवा दोघं जोडीनं जातो
खांद्यावर हात तुमच्या माझा ऱ्हातो
आपण आपल्या नादात असतो
हे बघून कुणीतरी हसतो
तिकडं ध्यानंच द्यायाचं न्हाई
आपलं गुळपीट चालू द्या बाई ।।२।।

दोघं मॅचिंग घालतो चांगलं ऱ्हातो
नटून थटून फिराया जातो
राघू मैने वाणी होतो गोष्टीत दंग
कुणी टवाळीचा बांधतोय चंग
तिकडं ध्यानंच द्यायाचं न्हाई
आपलं गुळपीट चालू द्या बाई ।।३।।

## ५०

(खळखळ खळखळ पैकं वाहत्यात, लक्ष्मी दारात कणग्या भरत्यात...
पुढं काय ठरविलं हाय का? हिचं म्हणणं तुम्ही हो ऐका...)

बँकेत तुम्ही डिपॉझिट केलं
दिसामासानं वाढू लागलं
मॅच्युअर होईल नऊ मासानं
अन् मोजून घ्या दो हातानं
राया मोजून घ्या दो हातानं ।।धृ.।।

मुद्दल हाय शाबूत तुमचं
गोंडस याज बी हातात खेळतं
त्याला नावं द्या तुमच्या मनानं
अनं मोजून घ्या दो हातानं
राया मोजून घ्या दो हातानं ।।१।।

ठेव तुम्ही अशी सांभाळून ठेवा
पुनांदा एकदा बँकेत यावा
दुबारा व्याज घ्या सुखानं
अन् मोजून घ्या दो हातानं
राया मोजून घ्या दो हातानं ।।२।।

आता तुम्ही खोला बचत खातं
जमतील तेवढं पैक टाकं
काढून घ्या टप्या टप्यानं
अन् मोजून घ्या दो हातानं
राया मोजून घ्या दो हातानं ।।३।।

घरचा गल्ला मारू नगा डल्ला
एक एक नाणं जपायचं
साठवून ठेवंत प्रेमानं
अन् मोजून घ्या दो हातानं
राया मोजून घ्या दो हातानं ।।४।।

## ५१

(एक झाली की दुसरी येतीया, मनात कामना खुलून जातीया...
तिला सांभाळा... लई सांभाळा...)

किती वर्ष झालं तुम्ही येता
माझ्या संगतीनं खुशाल ऱ्हाता
या खुशीला फ्रेम मध्ये टाकू
चला काढूया जोडीनं फोटू ।।धृ.।।
छोटेखानीच लगीन बरं
उगाच गर्दी नगंच खरं
चांगला मुहूर्त शोधून काढू
देवळात जाऊन हार तो घालू
पोजला या चला फ्रेम मध्ये टाकू
चला काढूया जोडीनं फोटू ।।१।।
टुमदार एक असं छोटंस घर
दोन खोल्यांची माडी बांधा वर
गोडीगोडीनं माडी चढू अन्
दोनाचे चार सहा वाढू
मग समद्यांचा फोटू काढू
चला काढूया जोडीनं फोटू ।।२।।
वर्षावर्षाला आठवण ठेवा
आपल्या लग्नाचा वाढदिवस जवा
दोघं तसंच सजंत जाऊ
नावं घेऊन घास हो खाऊ
आपला अल्बम जोडीनं पाहू
अन् असाच फोटू काढू
चला काढूया जोडीनं फोटू ।।३।।

## ५२

(येणं न जाणं, घाईत ऱ्हाणं, न्हाय आता हिला हो खपायचं...
तुम्ही लई लई लई हिला जपायचं...)

कशास बघता वरखाली तुम्ही
ऐवज तुमचा माना
आणि घाईत नकोच नको ना बाई
राया मुक्कामी तुम्ही हो याना
सजना, मुक्कामी तुम्ही हो याना ।।धृ.।।

ऐतवारी या अन सोमवारी जा
पाहुणचार तुम्ही घ्या ना
एक जोडी कापडं
ठेवा ना हिकडं
तुम्ही हे घर आपलंच माना
राया मुक्कामी तुम्ही हो याना
सजना, मुक्कामी तुम्ही हो याना ।।१।।

रूपाचं चांदणं अंगावर गोंदणं
खुशाल पांघरून घ्या ना
तुम्ही असे पिरतीत
लाडाच्या गिरकीत
मला अलगद उचलून घ्या ना
राया मुक्कामी तुम्ही हो याना
सजना, मुक्कामी तुम्ही हो याना ।।२।।

सारी सारी रात मग
जागवून काढू
इश्काच्या ताटात
पक्वान वाढू
लाजू नका अजिबात भरपेट खाना
राया मुक्कामी तुम्ही हो याना
सजना, मुक्कामी तुम्ही हो याना ।।३।।

## ५३

(महाराष्ट्राची माती अजब, आश्चर्य हितं घडतेत गजब,
तुमी असं काहीतरी करा, हिला अलगद उचलून धरा...)

राया खुराक तुम्हासनी देते
लाल मातीत घेऊन जाते
आखाड्यात तुम्ही हो कुस्ती खेळा
शड्डू ठोकून द्यावा आरोळा
म्होरच्याला लगेच लोळवा
हिंदकेसरी आता जिंकून घ्या
हिंदकेसरी औंदा घेऊन या ।।धृ.।।

डाव सारे माहीत करून घ्या
प्रतिडाव सारे जाणून घ्या
त्याला उचला की आपटून द्या
हिंदकेसरी आता जिंकून घ्या
हिंदकेसरी औंदा घेऊन या ।।१।।

त्याला अंगावर घ्या, गरगर फिरवा
तुम्ही उचलून त्याला मैदान मिरवा
रांगडा गडी त्याला पाणी पाजा
हिंदकेसरी आता जिंकून घ्या
हिंदकेसरी औंदा घेऊन या ।।२।।

तुम्ही कोल्हापुरी पैलवान
हाय लई बलवान
आखाडा समदा गाजवून द्या
हिंदकेसरी आता जिंकून घ्या
हिंदकेसरी औंदा घेऊन या ।।३।।

आता वस्ताद तुम्हीच कुस्तीचे व्हनार
पिरतीचा आखाडा काबीज करणार
मला एका हातानं उचलून घ्या
हिंदकेसरी आता जिंकून घ्या
हिंदकेसरी औंदा घेऊन या ।।३।।

## ५४

(खाजगीत हिला भेटलाय तवा, फुलून गेलाय शिनगार जवा...
काय घडलय काय... सांगा घडलंय काय...)

कुडकुडतेय मी वाजतीया थंडी
तुमच्या अंगातली द्या हो बंडी
आठवतंय ना त्या दिवशी म्या
लावून दिलीया गुंडी
तुमच्या अंगातली द्या हो बंडी ।।धृ.।।

तुम्हांसनी किनई घाईच लई
उठलात एकदम काही पाहिलंच नाही
कपाटाला मग अडकून तुटली जी
शिवून दिलीया गुंडी
आता द्या की मला ती बंडी ।।१।।

आणि एकदा तुम्ही मला कुशीत घेतलं
सरकायचं नाव न्हाय चिपकुन बसलं
राणीहारामधी अडकून तुटली
शिवून दिलीया गुंडी
तीच ती द्या की मला हो बंडी ।।२।।

एके दिवशी तुम्ही, अचानक आलात
खुंटीला बंडी लटकून बसलात
दारावर कुणी वाजवली कोंडी
तवा घाईत घालताना तुटली जी
म्या शिवून दिलीय गुंडी

## ५५

(नवीन नवीन आलेत रोग, लक्षणं यांची बदलून रोज...
समदा गोंधळ की हो उडालाय गोंधळ की...)

सर्दी खोकल्याला घाबरत व्हतं का कुणी
थोड्या तापानं हैराण झालेय मनी
तुम्ही तपासा मला, चांगलं तपासा मला
कोरोना झालाय का धनी न
सांगा कोरोना झालाय का धनी ।।धृ.।।

मुडदा बसवला चिनी लोकांचा
जगाला तरास करामतींचा
समद्या जगाची परेशानी
कोरोना झालाय का धनी न
सांगा कोरोना झालाय का धनी ।।१।।

माणसात माणूस ऱ्हाईला न्हाई
मुसक्या आवळून घरात ऱ्हाई
ठप्प झालिया सारी आमदनी
कोरोना झालाय का धनी न
सांगा कोरोना झालाय का धनी ।।२।।

त्यो म्हणं छोटा इषाणू हाय
त्याच्यात म्हणं जिवंच न्हाय
निसर्गाची का अवकरणी
कोरोना झालाय का धनी न
सांगा कोरोना झालाय का धनी ।।३।।

न्हाय नव्हं मला कोरोना झाला
तुमच्या संग जगायचं मला
त्याला हरवून टाकावं समद्यांनी
मग कोरोना कुठून होईल धनी

५६

(कुठं कुठं जाता, हिला संगती नेता आता नवीन कुठं हो जायचं,
हिनं नवीन काय हो पाहायचं...)

गडी चंद्रावर जायाचं म्हणतोय
मला संगती न्यायाचं म्हणतोय ।।धृ.।।
तिथं म्हणं आता जागा निघाल्या
मानवी वस्त्या होऊ लागल्या
जागा इकत घ्यायाची म्हणतोय
गडी चंद्रावर जायाचं म्हणतोय
मला संगती न्यायाचं म्हणतोय ।।१।।
तिथं बंगला बांधू की चांगला
त्यात संसार मांडू दांडगा
तिथं बगीचा फुलवायचा म्हणतोय
गडी चंद्रावर जायाचं म्हणतोय
मला संगती न्यायाचं म्हणतोय ।।२।।
मला म्हणे खा तू कितीही खा
वजनाची चिंता उगा नका
शंभर किलोचं सोळा भरल म्हणतोय
गडी चंद्रावर जायाचं म्हणतोय
मला संगती न्यायाचं म्हणतोय ।।३।।
तिथं म्हणं टाक पाऊल नाजूक
हवेत अलगद उडतंय माणूस
जरा चांदणं हाती घेऊ म्हणतोय
गडी चंद्रावर जायाचं म्हणतोय
मला संगती न्यायाचं म्हणतोय ।।४।।

५७

(कधीच कुणाला वधली न्हाय, तळमळ तळमळ मासोळी हाय,
केलं काय... सांगा केलंत काय...)

असा निशाणा साधता तुम्ही
तीर नेमानं सोडता धनी न
घायाळ झाले मी ।।धृ.।।

हाती मदनाचं धनुष तुमच्या
तीर फुलांचे रोखता कोणत्या न
घायाळ झाले मी ।।१।।

असं राजबिंडं रूप तुमचं
डोळ्यात करारी भाव न
घायाळ झाले मी ।।२।।

मुरक्या मुरक्या हो गालात हसता
मला चोरून कशाला बघता न
घायाळ झाले मी ।।३।।

एकदा खुणावलं तुम्ही की चक्क
दादला करायचं ठरवलं पक्कं न
घायाळ झाले मी ।।४।।

## ५८

(अगं अगं अगं काय म्हणतीयास, कसलं हं मागणं सांगतीयास...
पुरं करतील का, मागणं कसं हे पुरं करतील का...)

तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीत्झरलँड मला पहायचं ।।धृ.।।

करा तुम्ही बुकिंग तिकिटाचं
विमानातून मजेत उडायचं
दोघं सोबतीनं एकांती तिथं रहायचं
तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीतझरलँड मला पहायचं ।।१।।

आल्प्सची बर्फाच्छादित शिखरं
हिमनदी न हिरवं हिरवं खोरं
सरोवराच्या काठाला ऱ्हायचं
तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीतझरलँड मला पहायचं ।।२।।

मला चीज फंड्यू, सॅफरन सिझोटो
फेमस चॉकलेट खायचं
घड्याळ, मेलटेड चीज आणायचं
तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीतझरलँड मला पहायचं ।।३।।

जुरीच जिनेवा लॉसने शहरं
बर्न राजधानीला जायचं
तिथं बर्फात दोघांनी खेळायचं
तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीतझरलँड मला पहायचं ।।४।।

तुमच्या संगतीनं सुंदरता डोळ्यात साठवीन
पृथ्वीवरच्या स्वर्गात राहीन
तिथं तुम्हांसनी सारं सुख द्यायाचं
तुमच्या संगतीनं विदेशी जायाचं
राया स्वीतझरलँड मला पहायचं ।।५।।

## ५९

(तुमी नशीबवान, घ्या मानाचं पान ही तुमच्या मागं फिरतीया
तिची तुमच्यावर हाय पिरतीया)

राग तुमचा आहे हा लटका
उगा मानेला देताय झटका
कसा देखणा रावा माझा नं
शोभतोय डोईवर ह्यो पटका ।।धृ.।।

रंग गुलाबी गुलाबी कापड पटक्याचं
त्याला जरीचं काठ न कापड ताठ
गुंडाळताना द्या आवळून फटका
कसा देखणा रावा माझा नं
शोभतोय डोईवर ह्यो पटका ।।१।।

असं रागावून कुठं निघालात
वळून मागं पाहिनात
अरे कुणीतरी त्यांना हटका
कसा देखणा रावा माझा नं
शोभतोय डोईवर ह्यो पटका ।।२।।

असं बोलला न्हाईत ना मला
चैन पडत न्हाय या जिवा
मग काळजाला लागतोय चटका
कसा देखणा रावा माझा नं
शोभतोय डोईवर ह्यो पटका ।।३।।

६०

(आजकाल हरवून बसलीया सखी, कुणाला काय बी सांगत नसती...
काय झालंय काय... हिला झालंय काय...)

नहाणी मध्ये नहात होते
रूपाला आपल्याच निरखंत होते
कुणी दारावर मारली जोराची थाप
मी गुंडाळली टॉवेल आपोआप
दार उघडलं तर तुम्ही दिसलात
कसं न्याहाळंत मला तुम्ही बसलात
मी ओशाळले राया ओशाळले
तुमच्यावर भाळून बसले ।।धृ.।।

तुम्ही दुरून घेतलात गोड गोड मुका
मग होत गेल्या दोघांच्या चुका
मी मिठीत ओघळले
मी ओशाळले राया ओशाळले
तुमच्यावर भाळून बसले ।।१।।

तुम्ही सोडंचनात रेशमाची मिठी
मला म्हणालात खाऊ दे साखर पिठी
तुमच्या शब्दानं मी पाघळले
मी ओशाळले राया ओशाळले
तुमच्यावर भाळून बसले ।।२।।

मग भेट ही आपली सपनात दिसली
झोपेत म्या खुदकन हासली
लोणी पिरतीचे तवाच वितळले
मी ओशाळले राया ओशाळले
तुमच्यावर भाळून बसले ।।३।।

## ६१

(हिला हवा होता हो जसा साथीदार, गावलात तुमी की जीवनाचं भागीदार
तुमचं चालू द्या... चालू द्या...)

किती खट्याळ तुम्ही मिश्किल धनी
खोड्या चालत्यात तुमच्या किनई
किती खट्याळ तुम्ही मिश्किल धनी
खोड्या चालत्यात तुमच्या किनई
खोड्या ग्वाड वाटत्यात
लई ग्वाड वाटत्यात
लईच ग्वाड वाटत्या ।।धृ.।।

म्या साखरझोपेत असताना
तुम्ही पिरतीचे शिक्के मारता
तवा लाडिक वाटता
खोड्या ग्वाड वाटत्यात
लई ग्वाड वाटत्यात ।।१।।

पाण्याला जाते, येताना हंडा भरून येते
जवा हात माझे गुतलेले
तवा गुदगुदल्या करता
खोड्या ग्वाड वाटत्यात
लई ग्वाड वाटत्यात ।।२।।

थापाया भाकरी करते सुरुवात
मानेवर अलगद तवा फिरविता हात
माझ्या कंबरेला वितीनं मोजता
खोड्या ग्वाड वाटत्यात
लई ग्वाड वाटत्यात ।।३।।

कवा दिसाची करताय रात
रातीचा होतोय दिस
किती येळा करताय किस
खोड्या ग्वाड वाटत्यात
लई ग्वाड वाटत्यात ।।४।।

# लेखिकेचा परिचय

**नाव – डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी**

**जन्म –**

श्रीमती मृणालिनी आणि श्री. पंढरीनाथ कुलकर्णी यांच्या पोटी तुळजापूर, महाराष्ट्र येथे इ.स. १९७७ साली.

**शिक्षण –**

एम.ए. (संस्कृत) एम. एड., पीएच.डी. (संस्कृत) सेट, नेट प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण. बी.ए.ला संस्कृत विषय घेऊन पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आणि संस्कृत विशारदला टिळक महाराष्ट्र विद्यापीठात सर्वप्रथम.

**सेवा –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे संस्कृत विषय घेऊन राज्यात सर्वप्रथम स्थान प्राप्त करीत शासनात राजपत्रित अधिकारी वर्ग-१ म्हणून कार्यरत.

**अध्यापन अनुभव –**

२१ वर्षे, शासकीय महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सातत्याने अध्यापन.

**प्रशासकीय अनुभव –**

अध्यापनाबरोबरच विविध प्रशासकीय पदेही भूषविली. महाराष्ट्र राज्याच्या सर्वप्रथम पूर्णवेळ महिला भाषा संचालिका; प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग या पदांवर योगदान. सध्या ऑगस्ट २०२२ पासून उपमुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत.

**शोधकार्य –**

अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, संमेलन यातून सहभाग आणि सर्वोत्कृष्ट शोध निबंधांचे पुरस्कार प्राप्त.

विश्व संस्कृत संमेलन, बँकॉक, थायलँड २०१५ यात सहभाग व शोधनिबंध वाचन.

**प्रकाशित ग्रंथसंपदा –**

आजवर ३५ पुस्तके प्रकाशित. त्यात श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, विवेकरत्नानि, वेदकालीन स्त्रीरत्नानि, प्रकाशमार्गाः हे (संस्कृत ग्रंथ) तसेच विवाह–संस्कार, स्मृतिवचनानि, स्मृति–प्रतिपादित–न्याय, प्राचीन भारतीय समाज –भाग १, भाग २, विज्ञानातील संस्कृत, चतुरंग, शोधामृत, संस्कृत – मराठी उखाणे (संस्कृत संबद्ध पुस्तके), जीवन चिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रिया, अणुविज्ञानातील झंझावात डॉ. अनिल काकोडकर, गौरवगाथा सूर्याची (मराठी पुस्तके), मंजुमंजिरी, सर्ग – निसर्ग (मराठी काव्य ऑडियो बुक) प्रकाशित असून सूर्य शक्ती और मानव, कौटिलीय अर्थशास्त्र भाग १ व भाग २, स्मृतिग्रंथ आणि प्राचीन भारतीय न्यायव्यवस्था ही पाच हिंदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**नुकतेच प्रकाशित होत असलेले मराठी ग्रंथ –**

अनमोल विचार ठेवा– नचिकेता (वैचारिक लेखसंग्रह), लावण्यसखी (लावणी संग्रह), कणखर बाणा – राणी अहिल्या (चरित्र), बकुळ फुले (काव्यसंग्रह), मृद्‌गंध (ग्रामीण काव्यसंग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा (प्रेमपर काव्यसंग्रह), आरस्पानी जीवनगाणी (जीवनपर काव्यसंग्रह), गोड गोड पापा (बालकाव्यसंग्रह), सर्ग – निसर्ग (निसर्गपर काव्यसंग्रह)

**अन्य योगदान –**

व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, साहित्य अकादमी पुरस्कार २०२० प्राप्त प्रथितयश लेखिका, उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च

प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्त्या, सुप्रसिद्ध व्याख्याता, प्रवचनकर्त्या, निवेदिका, अभिवाचक, सूत्रसंचालिका, एकपात्री प्रयोगकर्त्या अशा नानाविध रूपात भाषाकार्य, भाषाविषयक संशोधन, अनुवाद, ब्रीदवाक्य निर्मिती, परिभाषा कोशनिर्मिती, भाषाधोरण निर्मिती अशा भाषाविषयक महत्त्वपूर्ण कार्यात अग्रेसर.

**विश्वविक्रम –**

मराठी काव्यक्षेत्रात जागतिक कीर्तीमान स्थापित. 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमाची नोंद झालेली आहे. मराठीत काव्य, ललित, चरित्रात्मक, वैचारिक लेखनव्रत निरंतर सुरू.

**साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार – २०२० च्या मानकरी**

'प्रकाशमार्गा:' या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या मराठी जीवनचरित्राच्या संस्कृत अनुवादासाठी प्राप्त.

**प्रकल्प –**

१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित वैदिक साहित्याचा इतिहास (२६० पृष्ठे ) या मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प साहित्य अकादमीने प्रदान केलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण करून साहित्य अकादमीत सादर केलेला आहे.

२) आचार्य बाळाराव सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत आणि हिंदी अनुवाद प्रकल्प स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी प्रदान केला आहे. ते कार्य सुरू आहे.

**विशेष उल्लेखनीय –**

गेल्या २५ वर्षांपासून भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन्

कार्यरत आहे. साहित्यिक व्रत म्हणून गेल्या ४ वर्षांपासून रोज काव्यरचना करत असून त्या प्रसारितही करीत आहे.

त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारीजी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

पुरस्कार, सन्मान साहित्यिक, शैक्षणिक, प्रशासकीय, सांस्कृतिक योगदानासाठी – अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

१. परळी भूषण पुरस्कार २०२३

२. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)

३. संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. वि.म. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३

४. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार

५. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे – साहित्य रत्न पुरस्कार २०२२

६. सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२

७. मुन्शी प्रेमचंद सन्मान २०२२

८. अणु विज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर, या ग्रंथास ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

९. महात्मा फुले राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

१०. राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०

११. लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार २०१९
१२. संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
१३. राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत वि. द. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
१४. पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई) चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०१७
१५. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी, जि. बीड (महा) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
१६. द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
१७. गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०१६
१८. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
१९. राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला गौरव पुरस्कार २०१२
२०. राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
२१. दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय नवोदित संस्कृत कवी प्रतियोगिता पुरस्कार २०१२
२२. लोकमत, माझी आई पुरस्कार २०१२
२३. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२४. संस्कृत नाट्य महोत्सव संहितालेखन, प्रथम पारितोषिक २०११
२५. संस्कृत नाट्य महोत्सव, द्वितीय पारितोषिक २०११
२६. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
२७. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२८. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
२९. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, सर्वतृतीय २००१
३०. मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
३१. महाराष्ट्र शासनाचा संस्कृत प्रावीण्य पुरस्कार १९९८

■